## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) : तरूणांनी आपल्या जगण्याचा हेतू काय आहे हे निश्चित करून वाटचाल केल्यास दीर्घकाळ आनंदी जीवन जगता येते मात्र या जगण्यात व्यसनाला दूर ठेवा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अमृत बंग यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहात मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमाले अंतर्गत अमृत बंग यांचे व्याख्यान झाले. 'निर्माण: युवांच्या अर्थपूर्ण जीवनाचा शोध' या विषयावर त्यांनी संवाद साधला. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी होते. यावेळी चिफ रेक्टर प्रा. एस.आर. चौधरी, डॉ. विशाल पराते, डॉ. अजय गोस्वामी, डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. शिरपूरच्या कर्मवीर व्यंकटराव रणधीर प्रतिष्ठान यांनी दिलेल्या देणगीतून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री. बंग म्हणाले की, वयाच्या २४व्या वर्षापर्यंत ७५% मानसिक आरोग्याचे प्रश्न सुरु झालेले असतात. ताण तसेच दारू वा इतर काही कारणे आहेत. भारतात तरूणांची संख्या अधिक असल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर विदेशातील दारू कंपन्या या तरूणांना जाळयात ओढतात. त्यातूनच वैफल्य आणि हिंसा निर्माण होते. व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन करतांना श्री. बंग यांनी जगण्याचा आपला उद्देश काय आहे हे समजून घ्या असे मत व्यक्त केले. मानवी मूल्य आणि सामाजिक प्रश्नांप्रती आपली बांधिलकी ठरवा, मी माझ्यापुरते पाहिल ही घातक प्रवृत्ती आहे. लोकसंख्या ही आमची ताकद आहे ती अडचण नाही. असे सांगतांना त्यांनी विविध कौशल्य प्राप्त करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना श्री. बंग यांनी उत्तरे दिली. अध्यक्षीय समारोप प्रा.एस.टी. इंगळे यांनी केला. जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कक्षअधिकारी प्रवीण चंदनकर यांनी केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे झालेल्या गांधी सप्ताहात अमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात माजी कुलगुरू प्रा. एन.के. ठाकरे यांचे व्याख्यान झाले.

गांधी प्रभाव : लगे रहो निंबाभौ या विषयावर व्याख्यान देतांना प्रा. ठाकरे यांनी गांधी विचारांचा प्रभाव असल्यामुळे विद्यापीठाच्या उभारणीत नवे व सत्याच्या अधारावर प्रयोग केले असे स्पष्ट केले. प्रशाळेचे प्रभारी संचालक तथा व्य. प. सदस्य प्रा. म.सु. पगारे यांनी अध्यक्षीय भाषणात गांधी विचार या देशाच्या मातीतून उगवणे आणि पेरला जाणे हे देशाच्या उज्वल भवितव्यासाठी महत्वाचे असल्याचे सांगितले. यावेळी तत्त्वज्ञान केंद्राचे मानद संचालक डॉ.डी.एच. भावसार, अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, प्राचार्य व्ही.एन. पाटील, डॉ. मनीष करंदे उपस्थित होते. विभाग प्रमुख उमेश गोगडिया यांनी प्रास्ताविक केले. डॉ. हेमंत पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ९ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी